# Bio – data



Name :- **Prof. Sarang Pandurang Sakharam**

Education :- B.A. (psychology) and B.A. (sociology)
M.A.(sociology) and M.A. (History)

Address :- Ambai Colony, Kapashi Rd. Murgud
Tal.Kagal Dist.Kolhapur (MS) 416209

Phone :- (R).02325 – 265233
(o) : 02325 – 264213
Mob-9421114522,9823165884 (Whatsup)

Position Held :- **Associate Professor and Head**
Department of Sociology
Sadashivrao Mandlik Mahavidyalay Murgud.

Experience :- 30 years.

Corporate Responsibilities :-

- Co-ordinator : Parents club.
- Co-ordinator : बेटी बचाओ – बेटी पढाओ.
- Worked as N.S.S. officer . etc.

Publications :- Co-writer of Eight SIM Books.
Published by Shivaji University Distance education – S.V.K.,Kolhapur.

Corporate Contributions :-

Work in different various committees of university .Like paper setting , Moderation , Syllabus formations , cap co-ordinator, Local inquiry commitee and Selection committee etc.

Life Member: S.U.T.A. ,

Member- Marathi Sociology Conference

Extension Work-

१९८९ पासून वरिष्ठ महाविद्यालयाच्या सेवेत असल्यापासून जनजागृती लोकप्रबोधनाचा अव्याहत ध्यास घेवून प्रबोधनाची निरंतर चळवळ सुरू. प्रारंभी १९८९-१९९० साली भारत सरकारच्या शिक्षण व प्रौढ साक्षरता अभियानात सर्वच खेडयापाडयातून वाडयावस्त्यातून जनजागृती केली.

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ व कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या माध्यमातून वाचन ,ग्रंथवाचन चळवळीत सक्रिय कार्य केले. गाव तिथे ग्रंथालय चळवळीची जनजागृती केली.

महाराष्ट्र सरकारच्या लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रमात,कुटुंब नियोजन व कुटुंब कल्याण या विषयावरील प्रबोधनात सक्रिय सहभाग घेतला. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून हे कार्य केले.

१९९० पासून महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या एड्स जनजागृती अभियानात कोल्हापूर जिल्हयाचा प्रतिनिधी म्हणून संपूर्न महाराष्ट्रात या अनुषंगाने प्रबोधनाचे कार्य केले. पोश्टर प्रदर्शन भरवणे. आरोग्य विषयक विशेषांक प्रकाशीत करणे असे कार्य केले. छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालय कोल्हापूर . यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांचे माध्यमातून तसेच पंचायत समिती. जिल्हा परिषद विभागाच्या माध्यमाने हे कार्य केले. 'एड्स जाणा एड्स टाळा' या अनुषंगाने हजारो व्याख्याने देऊन युवक वर्ग ,विद्यार्थी वर्ग, ग्रामस्थ व तरूण मंडळातून प्रबोधनाचे कार्य केले.

छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालय कोल्हापूरने जिल्हयाचा ब्रॅण्ड ॲम्बसिडर म्हणून संपूर्ण राज्यभर हे कार्य करण्याची संधी दिली . आरोग्य विभागातील पल्स पोलीओ ,क्षयरोग निर्मुलन ,कुष्ठरोग निर्मुलन ,नवदांपत्य जागृती उपक्रम , कुटुंब कल्याण उपक्रम अशा अनेक आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमात सहभाग घेतला .

'व्यसनमुक्ती' हीच युवाशक्ती. राष्ट्रशक्ती या अनुषंगाने जनजागृतीचे असंख्य उपक्रम व पोस्टर प्रदर्शने याव्दारे व्यसनमुक्ती चळवळीत कार्य केले . दारूबंदी साठी ग्राम प्रबोधने. महिला जागृती मेळावे यातून मार्गदर्शन केले . ग्रामस्थ , तरूण मंडळे, महिला मंडळे याबरोबर दारूबंदी कार्यालय जिल्हा परिष्द कोल्हापूर या सर्वांच्या पुढाकाराने व्यसनमुक्तीचे शेकडो कार्यक्रम केले .

"अंधश्रध्दा निर्मुलन व वैज्ञानिक दृष्टीकोन" या अनुषंगाने प्रबोधनाची चळवळ मोठया प्रमाणात राबवली . अंधश्रध्दा निर्मुलनासाठी भंडाफोड कार्यक्रम राबविले . तसेच वैज्ञानिक दृष्टीची अनेक प्रात्यक्षिके सादर करून शाळा,तरूण मंडळे,ग्रामस्थ व महिला मंडळे यांच्यासाठी अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्यक्रम केले .

सहकार चळवळीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे व कोल्हापूर जिल्हा सहकार बोर्ड यांच्या विद्यमाने शेकडो पतसंस्था ,सहकारी सेवा संस्थामधुन सभासद ,संचालक व कर्मचारी मेळाव्यातून जनजागृती केली .

मुल्य शिक्षणाचा महाराष्ट्र राज्याने शिक्षणात समावेश केल्यानंतर कोल्हापूर जिल्हयातील असंख्य प्राथमिक शाळा,माध्यमिक शाळातून विद्यार्थी,पालक व शिक्षकाकरीता मुल्य शिक्षणाचे जनजागरण केले . याशिवाय शासनाने स्विकारलेले नवोक्रम ,हसतखेळत शिक्षण,आनंददायी शिक्षण ,शालेय आपत्ती व्यवस्थापन ,वेळेचे व्यवस्थापन,शालेय व्यवस्थापन,उपक्रमशीलता,ज्ञानरचनावाद असे असंख्य विषयावर असंख्य व्याख्याने दिली . विद्यार्थी मेळावे,शिक्षक संमेलने यातून प्रबोधन केले .

पर्यावरण व सामजिक वनिकरण या अनुषंगाने असंख्य ठिकाणी जनजागृती केली. झाडे लावा पृथ्वी वाचवा अभियान सुरू केले. ज्ञानदानाचाच एक भाग म्हणून रक्तदान, अवयव दान , श्रमदान अशा अनेक नव्या विषयावर प्रबोधन केले.

सामाजिक सुरक्षितता , सप्ताहाच्या अनुषंगाने तसेच नित्य उपक्रम म्हणून सामाजिक सुरक्षितता, औद्योगिक सुरक्षितता, औद्योगिक आपत्ती व्यवस्थापन असे विषय घेवून कोल्हापूर जिल्हयातील अनेक औद्योगिक संस्थामधून जनजागृती केली.

व्यक्तीमत्व विकास ,मनुष्यबळ विकास ,स्वयंरोजगार ,कौशल्य विकास यासारखे विषय घेऊन शाळा, महाविद्यालये ,सहकारी संस्था, औद्योगिक संस्था, तंत्र संस्थामधून असंख्य व्याख्याने दिली.

महाराष्ट्र राज्याने महिला सबलीकरण धोरणाचा पुरस्कार केला. या अनुषंगाने महिला सबलीकरण, महिला व्यक्तीमत्व विकास, महिला स्वावलंबन, स्त्रि पुरूष समानता, महिला बचत गट, महिला उद्योगजकता विकास अशा अनेक विषयावर महिला मेळावे युवती विकास कार्य कमातून असंख्य जनजागृती कार्यकम केले. केंद्रिय कामगार श्रम मंत्रालय मुंबई शिक्षण विभाग, नाबार्ड ,महिला आयोग, कोल्हापूर जिल्हा सहकार बोर्ड, कोल्हापूर जिल्हा सहकारी बॅक (K.D.C.C), कोल्हापूर जिल्हा गोकूळ दुध उत्पादक संघ या सर्वांच्या माध्यमातून आयोजित महिला व युवती विकास मेळाव्यातून महिला सबलीकरणासाठी नित्य जनजागृती केली. स्थानिक पातळीवरील खेडयापाडयातून महिला बचत गट मेळावे, हळदीकुंकू समारंभातून अनेक प्रबोधनपर व्याख्याने दिली.

कोल्हापूर जिल्हा दुध उत्पादक संघ गोकूळ यांच्यावतीने आयोजित अनेक पशुसंवर्धन व दुग्ध विकास मेळाव्यातून स्त्री व पुरूष या सर्वांकरीता प्रबोधन केले.

महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या स्त्रि भ्रूणहत्या प्रतिबंधक उपकमाचा भाग म्हणून लेक वाचवा, लेक शिकवा, स्त्रि पुरूष समानता पाळा. अशा विषयावरील असंख्य व्याख्याने

ग्रामस्थ,शालेय संस्था, सहकारी संस्था व महिला मंडळातून देऊन मुलींना सांभाळा स्त्री भृणहत्या टाळा या विषयी असंख्य व्याख्याने दिली .

अस्पृष्यता निर्मुलन (जातीभेद निर्मुलन) , धर्मनिरपेक्षता,सर्वधर्मसमभाव जनजागृतीचे कार्यक्रम अगदी खेडया वाडया वस्त्यातून केले . अगदी गल्ली बोळापासून गावे शहरातून या विषयावरील व्याख्याने राष्ट्रीय उपक्रम म्हणून निरंतर सुरू केले आहेत .

सर्वच थोरामोठयांच्या जयंती उत्सवातून,पुण्यतिथीच्या समारंभामधुन शेकडो व्याख्याने देऊन राष्ट्रीय चारि>य बांधणीचे व उत्तम नागरीक निर्मितीचे कार्य केले आहे .सर्व संत व महंत साहित्याचा प्रचार व प्रसार करून नैंतिक व सांस्कृतिक मुल्ये जोपासणारी विचार चळवळ निरंतर चालू ठेवली आहे .

सेंद्रिय शेतीचे महत्व,परंपरागत पशूपालनाचे महत्व,आरोग्यदायी आहार या विषयाच्या अनुषंगाने प्रबोधन सुरूच आहे .

ग्रामस्वच्छता अभियान,स्वच्छता व आरोग्य या अनुषंगाने गावोगावी व्याख्याने दिली . मंडळे,शाळा,महाविद्यालये यांच्या राष्ट्रीय सेवा योजन कार्यक्रमातून स्वच्छता व आरोग्याचे प्रबोधन नित्य सुरू आहे .डेंग्यू,चिकनगुनिया,स्वाईन फ्लू अशा रोंगाच्या मुक्तीसाठी सदैव प्रबोधन सुरू आहे . स्वच्छता पाळा,आरोग्य सांभाळा हा मुलमंत्र सर्वांपर्यंत नेण्यासाठी नित्य कार्य चालू आहे .शाळा,ग्रामपंचायती,ग्राममंडळे,सेवा संस्थाच्या सहकार्याने हे कार्य जोमाने सुरू आहे .

औद्योगिक क्षेत्रातील कामगार मालक सहसबंध,कार्यनिष्ठा,कामाची गुणवत्ता,कामगार कल्याण या अनुषंगाने अनेक व्याख्याने दिली .कामगार सुरक्षाविषयक प्रबोधन केले . परंपरागत सण,उत्सवातून लोककल्याणकारी राष्ट्रविकास व कलासुसंगत उत्सवाचे आदर्श स्वरूप कसे असावे यासाठी सण,उत्सव,जयंती पुण्यतिथींच्या असंख्य कार्यक्रमातून

जनजागृती केली.श्रम,सुसंस्कार,शिस्त,स्वालंबन,सत्य,राष्ट्रभक्ती,आरोग्य व व्यायाम,आहारविहार जीवनशैली या विषयावरील व्याख्याने सुरू आहेत.

सध्या जागतिकीकरण व धकाधकीच्या गतीशील जीवनातील असंख्य जिवघेण्या सामाजिक ,आर्थिक,पर्यावरणीय व आरोग्य विषयक गुंतागंतीमुळे मानवी जीवन ताणतणावाच्या फे-यात सापडून जीवघेणे बनत आहे.वैफल्य व ताणतणावानी मानवी जीवन क्षणक्षण व कणकण व्यापले आहे यामुळे यावर एकच उपाय तो म्हणजे ताणतणावाचे व्यवस्थापन करणे या अनुषंगाने सध्या प्रबोधनाचा व्यापक जागर सुरू आहे. याबरोबरच चित्रपट,टी.व्ही.,मोबाईल,संगणक व वाहनाचे वेड यातून उद्भवणारे नवनवे गुंतगुंतीचे प्रश्न व समस्या या अनुषंगानेही प्रबोधन सुरू आहे.

फॅशन,डि.जे.,आर.जे.,चंगळवाद व सैराट जीवनप्रणालीने तरूणाईचे भान हरपत आहे या अनूषंगाने नियंत्रित जीवनशैली या विषयी प्रबोधन सुरू आहे. राजकारण विरहीत जनजागरण हे मुख्य व्रत सुत्र घेऊन.

कोणताही धर्म,पंथ,संप्रदाय,पक्ष वा जात अथवा मंडळ यांचा पुरस्कार वा तिरस्कार न करता सर्वधर्मसमभाव मानव कल्याणकारी ज्ञान, विज्ञान व आध्यात्म विचार घेऊन नित्य प्रबोधन केले आहे.बरे ते बोलणे यापेक्षा खरे ते बोलणे हा प्रबोधनाचा पाया असून कुणाल पटौ वा न पटो पण कटू सत्य मांडत राहणे हा वसा घेऊन गेली तीस वर्षे हे कार्य अखंड सुरू आहे फक्त व्दिपाद मानव प्राण्यालाच विज्ञान व आध्यात्म (सु.आचार) यांची शिकवण देणे म्हणजेच ज्ञान व सुसंस्कार देणे ही निरंतर गरज असते. हेच विस्तार कार्य अखंड करण्याचे व्रत घेतले आहे.

आजपर्यंत विविध विषयावरील अशी सुमारे ३००० पेक्षा अधिक व्याख्याने दिली.सदर कार्याबदद्ल विविध सेवाभावी संस्था,विश्वस्त संस्था,मंडळे,ग्रामस्थ,संस्था,तरूण मंडळे यांच्याकडून सुमारे २५ विविध सामाजिक पुरस्कार प्राप्त झाले.असून असंरूय

सन्मानपत्रे व गौरवपत्रे प्राप्त झाली आहेत . समाजानेही खूप काही मान सन्मान दिले . समाजाकडून मिळालेला गौरव हाच या कार्याचा मला मिळालेला भाग्योदय आहे .

**सध्या स्वतंत्र आत्मकथन लेखन व वाडःमय प्रकाशनाच्या मार्गावर आहे .**